फौ.कि.अर्ज.क्र.५८/२०२३

## निशाणी १४ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे सरंक्षण कायदा २००५ चे कलम १२, १७, १८, २०, २२ व २३ प्रमाणे जाबदेणार क्र.१ ते ५ यांच्याविरुध्द दाखल केलेला आहे. सदर अर्जात जाबदेणार क्र.३ कथन करतो की, जाबदेणार क्र.३ यांच्याविरुध्द दि.११/१२/२०२३ एक्स पार्टी आदेश पारित केलेला आहे. सबब, जाबदेणार क्र.३ विरुध्द झालेला एक्स पार्टी आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे. जाबदेणार क्र.३ यांनी सदर अर्जाच्या समर्थनार्थ **नि.१५** वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

२. अर्जदारातर्फे सदर अर्जास म्हणणे दाखल करत असे कथन केले आहे की, जाबदेणार क्र.३ यांना मे.न्यायालयाने आपले म्हणणे मांडण्यासाठी योग्य ती मुदत दिलेली आहे. परंत, जाबदेणार क्र.३ यांनी जाणूनबुजून मे.न्यायालयात आपले म्हणणे मांडले नाही. त्यामुळे मे.न्यायालयाने जाबदेणार क्र.३ यांना दंड म्हणुन ५,०००/- रुपये करण्यात यावा.

३. प्रस्तुत अर्ज व त्यावरील लेखी म्हणणे यांचे अवलोकन केले. दोंन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे सरंक्षण कायदा २००५ चे कलम १२, १७, १८, २०, २२ व २३ प्रमाणे जाबदेणार क्र.१ ते ५ यांच्याविरुध्द दाखल केलेला आहे. सदर अर्जाअंतर्गत जाबदेणार क्र.३ हे हजर राहुन देखील त्यांनी अर्जास म्हणणे दाखल न केल्यामुळे त्यांच्याविरुध्द दि.११/१२/२०२३ रोजी अर्ज एकतर्फा चालण्यात यावा म्हणुन आदेश पारित करण्यात आला आहे. सदर अर्ज गुणदोषांवर चालण्यासाठी जाबदेणार क्र.३ यांना अर्जात समाविष्ट करुन त्यांचे म्हणणे दाखल होणे अत्यंत आवश्यक आहे. सबब, वरील सर्व कारणांचा विचार करता मी खालील आदेश पारित करित आहे.

# आदेश

**१.** जाबदेणार क्र.३ यांचा अर्ज २००/- रुपये इतक्या कॉस्टसह मंजुर करण्यात येत आहे.

**२.** जाबदेणार क्र.३ यांनी सदरची कॉस्ट अर्जदार द्यावी.

***सही/-***

दि.०५/०१/२०२४

**(श्रीमती किर्ती अ. देशपांडे)**

७ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

वडगांव मावळ, पुणे.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **Shri.Sagar V. Ingale** |
| Name of the court | : | **Smt.Kirtee A. Deshpande** |
| | | **7th Jt. CJJD & JMFC,** |
| | | **Vadgaon Maval, Pune** |
| Judgment/order declared on | : | **05/01/2024** |
| Judgment/order signed by Presiding officer | : | **05/01/2024** |
| Judgment/order uploaded on | : | **05/01/2024** |